1. खालीलपैकी भावे प्रयोगातील उदाहरण ओळखा.
   (1) त्याने अभ्यास केला
   (2) वारा वाहतो
   (3) मला गाता येते
   (4) या पैकी कोणताच पर्याय योग्य वाटत नाही.

---

2. खालील पैकी कोणते उदाहरण केवल वाक्यात समाविष्ट होते ?
   (1) तो झाडावर चढत होता.
   (2) त्याचा पाय घसरला.
   (3) झाडावर चढत असताना त्याचा पाय घसरला.
   (4) या पैकी कोणताच पर्याय योग्य वाटत नाही.

---

3. प्, फ्, ब्, भ्, म् - या व्यंजन उच्चार प्रकारांना __________ म्हणतात.
   (1) कंठ्य
   (2) तालव्य
   (3) ओष्ठ्य
   (4) या पैकी कोणताच पर्याय योग्य वाटत नाही.

---

4. खालील वाक्यातील शब्दांच्या जाती ओळखा –
   'विद्यार्थ्यांच्या अंगी चिकाटी असावी'
   (1) भाववाचक नाम
   (2) सर्वनाम
   (3) विशेषनाम
   (4) समुदायवाचक नाम

---

5. शब्दांच्या जाती किती ?
   (1) 4
   (2) 2
   (3) 8
   (4) 5

---

6. प्रश्न विचारण्यासाठी __________ या सर्वनामाचा उपयोग होतो.
   (1) कोण ?
   (2) मी
   (3) किंवा
   (4) या पैकी कोणताच पर्याय योग्य वाटत नाही.

---

7. 'घरोघरी' – या शब्दाचा समास ओळखा.
   (1) इतरेतर द्वंद्व
   (2) बहुव्रीही समास
   (3) अव्ययीभाव समास
   (4) या पैकी कोणताच पर्याय योग्य वाटत नाही.

---

8. खालील वाक्याचा प्रकार ओळखा –
   'सचिन चांगला खेळतो.'
   (1) उद्गारार्थी वाक्य
   (2) नकारार्थी वाक्य
   (3) होकारार्थी वाक्य
   (4) आज्ञार्थी वाक्य

---



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

**9.** खालील उदाहरणातून अपूर्ण वर्तमान काळ ओळखा.
(1) मी जात आहे.
(2) मी गेलो आहे.
(3) मी जाणार आहे.
(4) या पैकी कोणताच पर्याय योग्य वाटत नाही.

---

**10.** खालील वाक्यातील वचन ओळखा –
'आपण उद्या भेटू शकाल का?'
(1) एकवचन
(2) अनेकवचन
(3) बहुवचन
(4) आदरार्थी बहुवचन

---

**11.** खालील वाक्यातील विभक्ती ओळखा –
'विद्यार्थ्यांनो, भरपूर अभ्यास करा.'
(1) द्वितीया विभक्ती
(2) चतुर्थी विभक्ती
(3) पंचमी विभक्ती
(4) संबोधन

---

**12.** खालील वाक्यातील प्रयोग ओळखा –
'येसाजीने ओठावरून जीभ फिरवली.'
(1) भावे प्रयोग
(2) कर्मकर्तरी प्रयोग
(3) कर्मणी प्रयोग
(4) कर्तरी प्रयोग

---

**13.** 'वयस्क'– या शब्दाचा योग्य अर्थ लिहा.
(1) तरुण
(2) प्रौढ
(3) अल्पवयीन
(4) लहान

---

**14.** 'दगडावर कोरलेला लेख' – या शब्दसमूहाबद्दलचा शब्द ________ .
(1) स्तंभालेख
(2) शिलालेख
(3) शिल्पचित्र
(4) मूर्तीचित्र

---

**15.** 'घरात नाही अन्नकोजी आणि माझे नाव माणकोजी'– या म्हणीच्या समानार्थाची म्हण ओळखा.
(1) घरात नाही मिठाचा खडा, बाहेर दाखवतो पठाणी जोडा.
(2) घरात घेववत नाही , बाजारात खपत नाही.
(3) नाव सोनुबाई हाती कथलाचा वाळा.
(4) या पैकी कोणताच पर्याय योग्य वाटत नाही.

---

**16.** 'गंमत लांबून पहावी' – या वाक्यातील क्रियाविशेषण अव्यय कोणते?
(1) गंमत
(2) लांबून
(3) पहावी
(4) क्रियाविशेषण अव्यय नाही.

---

https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

17. खालील वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा –
'मनधरणी करणे'
(1) त्याने मनाची धरणी केली.
(2) त्याने मनात विचार धरून ठेवले.
(3) त्याच्या मनात विचार धारण झाले.
(4) कर्ज माफ करण्यासाठी त्याने सावकाराची मनधरणी केली.

---

18. अर्थाच्या दृष्टीने एकमेकांशी संबंधित असलेली दोन किंवा त्याहून अधिक केवल वाक्ये एकत्र आणून त्यांचे जे एकच वाक्य तयार होते, त्याला काय म्हणतात ?
(1) वाक्यविचार (2) संधी (3) वाक्यसंयोजन (4) वाक्यनिर्णयन

---

19. वा! काय कमाल आहे! – या वाक्याचा प्रकार कोणता ?
(1) नकारार्थी (2) आज्ञार्थी
(3) उद्‌गारार्थी (4) या पैकी कोणताच पर्याय योग्य वाटत नाही

---

20. 'विटीदांडू' : समास ओळखा –
(1) इतरेतर द्वंद्व (2) वैकल्पिक द्वंद्व (3) द्विगु (4) बहुव्रीही

---

21. 'जेथे आकाश जमिनीला टेकल्यासारखे दिसते ती जागा' – या शब्दसमूहाबद्दलचा शब्द ________ .
(1) भूमिटेक (2) क्षितिज (3) पूर्वदिशा (4) मावळती

---

22. 'घर मोडून मांडव करणे'– या म्हणीस समान अर्थाची म्हण शोधा.
(1) घर जाळल्यावर बोंबा मारणे.
(2) घोडे विकून डांगर खाणे.
(3) लग्न करून पहावे आणि घर बांधून पहावे.
(4) घरात असतील तुरी संसार करतील पोरी.

---

23. 'राजाचा त्याग, तोच प्रजेचा भोग'
या म्हणीचा अर्थ ओळखा –
(1) नि:स्पृह सत्ताधारी असेल तर जनता समाधानात राहते.
(2) राजाने राज्य सोडले तर जनता दु:खी होते.
(3) जसा राजा तशी प्रजा.
(4) राजाने राज्यत्याग केला तरी जनतेने उपभोगात रममाण होऊ नये.

---

P.T.O.

https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

24. योग्य शब्द निवडून खालील म्हण पूर्ण करा.
_________ गळ्यात घंटी कोणी बांधायची?
(1) गाढवाच्या (2) शेळीच्या
(3) मांजराच्या (4) या पैकी कोणताच पर्याय योग्य वाटत नाही.

25. खालील सामासिक शब्दांचा प्रकार ओळखा –
'वेळी अवेळी'
(1) वैकल्पिक द्वंद्व समास (2) बहुव्रीही समास
(3) तत्पुरुष समास (4) समाहार द्वंद्व समास

26. 'अंधारी' या शब्दाची जात कोणती?
(1) नाम (2) सर्वनाम (3) विशेषण (4) क्रियाविशेषण

27. 'डोळ्यांना दिसणारे आणि कानाला ऐकू येणारे संपर्काचे माध्यम'– या शब्दसमूहाबद्दलचा शब्द _________.
(1) चित्रदर्शी (2) दृक्-श्राव्य (3) नभोवाणी (4) देववाणी

28. 'तुम्हाला जे आवडते, तेच मी करणार आहे' – या वाक्याचा प्रकार ओळखा.
(1) मिश्रवाक्य (2) संयुक्त वाक्य
(3) शुद्धवाक्य (4) गौणवाक्य

29. खालील उदाहरणातील वाक्यार्थ प्रकार ओळखा.
'देशाचे रक्षण करा!'
(1) स्वार्थ (2) आज्ञार्थ
(3) संकेतार्थ (4) या पैकी कोणताच पर्याय योग्य वाटत नाही.

30. खालील म्हणीचा वाक्यात उपयोग करा –
'थयथयाट करणे'
(1) घरभर नाचणे. (2) नापास झाल्यावर त्याने थयथयाट केला.
(3) त्याने तांडव नृत्य केले. (4) 'थय' 'थय' म्हणत तो नाचला.

31. खालील वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा –
'ब्रह्मानंद होणे.'
(1) ब्रह्माला आनंद होणे. (2) ब्रह्म आल्याने आनंदित होणे.
(3) मुलीचे लग्न ठरल्यामुळे आईला ब्रह्मानंद झाला. (4) मुलीला ब्रह्मांड आठवले.

https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

**पुढील उतारा वाचून प्रश्न क्र. 32 ते 35 ची उत्तरे लिहा.**

...... विचाराने वागा. विचाराप्रमाणे वागण्याचे धैर्य दाखवा, नेभळेपणा नको. त्याचप्रमाणे जातीधर्म यांच्या नावे द्वेष फैलावू नका. जो जो गरीब असेल, जो जो छळला जाणारा असेल तो आपला माना. छळणारा जो जो असेल तो परका माना. हिंदू-मुसलमान, गोरे-काळे असे भेद खरे नाहीत. खरे भेद प्राचीन काळापासून दोनच सांगितले आहेत. दुसऱ्यांच्या संसाराची धूळदाण करणारे व ती धूळदाण बंद करण्यासाठी खटपट करणारे, असा हा अनंत काळापासून झगडा आहे. तुम्ही न्यायाच्या बाजूने उभे रहा. जे काही शिकाल ते घेऊन, या झगड्यात मन:पूर्वक सामील व्हा. तुम्ही डॉक्टर झालात, तर तुम्हांला दिसेल की जनतेला औषधांची तितकीशी जरूर नसून नीट हवापाण्याची, नीट खाण्या-पिण्याची, नीट आंथरापांघरायची, थोड्या विश्रांतीची, थोड्या आनंदाची जरूरी आहे. ते कसे साधेल? समाजात क्रांती होईल तेव्हा. श्रमणाऱ्यांचा हक्क स्थापन होईल तेव्हा. श्रमाने घट्टे पडलेल्या हाताला खाण्याचा पहिला हक्क, यासाठी मग तुम्ही भांडाल. तुम्ही इंजिनियर झालात तर तुम्हांला काय दिसेल? खेड्यांतून नीट संडास नाहीत, गटारे नाहीत, रस्ते नाहीत, विहिरी नाहीत. या सोयी कशा देता येतील? त्यासाठी तुम्हांला क्रांती करावी लागेल. समजा तुम्ही शेतकीचे ज्ञान घेऊन आलात, ते शेतकऱ्यांत तुम्हांला पसरायचे आहे; परंतु शेतकरी आज कर्जबाजारी आहे. त्याच्या जमिनी सावकारांनी गिळल्या आहेत. जबर खंड द्यावा लागतो. उत्पन्न आले तरी हाती रहात नाही. त्यामुळे शेती करण्यात त्याचे लक्ष कसे लागणार? त्याची सदैव उपासमारच. हे बंद करावयाचे असेल, तर क्रांती करावी लागेल ....

---

**32.** समाजात क्रांती केंव्हा होईल?

(1) श्रमिकांना हक्क प्राप्ती झाल्यावर.

(2) शेतकऱ्यांना चांगला मान मिळाल्यावर.

(3) नेभळेपणा सोडल्यावर.

(4) झगडा सुरू झाल्यावर.

---

**33.** आपला कोणला मानावे?

(1) छळणारा (2) छळला जाणारा

(3) श्रमिक (4) सावकार

---

**34.** खाण्याचा पहिला हक्क कोणाचा?

(1) खेड्यातल्या शेतकऱ्याचा (2) डॉक्टर

(3) श्रमिक (4) कर्जबाजारी लोक

---

**35.** क्रांतीसाठी काय करावे?

(1) विचारीपणा, धैर्य, समता. (2) खेड्यात सोयी-सुविधा.

(3) शेतकऱ्यांना कर्जमाफी. (4) वैद्यकीय सोयी-सुविधा.

---



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/